MHLA090046712025

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१११९/२०२५ मध्ये निशाणी क्र.१ खालील आदेश

(ज्ञानोबा लक्ष्मण केंद्रे वि. निरंक)

१. अर्जदाराने स्वतःच्या व इतर वारसांच्या नावे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मंजूर होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदाराचे संक्षिप्त कथन असे की, अर्जदार नामे ज्ञानोबा लक्ष्मण केंद्रे यांचे वडील नामे लक्ष्मण माधव केंद्रे यांचे दि.२७.०३.२०२० रोजी तर आई नामे गवळणबाई लक्ष्मणराव केंद्रे यांचे दि.१०.०८.२०२५ रोजी मौजे कुमठा (खु.), ता. उदगीर, जि. लातूर येथे निधन झालेले आहे. अर्जदाराचे असेही कथन आहे की, मयताच्या पश्चात सदर मयतास अर्जदाराव्यतिरिक्त ४ मुले अनुक्रमे नामे धोंडीबा लक्ष्मण केंद्रे, तुकाराम लक्ष्मण केंद्रे, माधव लक्ष्मण केंद्रे व बळीराम लक्ष्मण केंद्रे व १ मुलगी नामे सुमन लक्ष्मण केंद्रे ह्या देखील कायदेशीर वारसदार आहेत.

३. अर्जदाराचे पुढे असेही कथन आहे की, मयताचा दुसरी एक मुलगी व अर्जदाराची बहीण नामे रशिकाबाई भगवानराव दहिफळे यांचेही दि.२१.०१.२०२६ रोजी मौजे कुमठा (खु.), ता. उदगीर, जि. लातूर येथे निधन झालेले आहे. सदर मयताच्या पश्चात त्यांना १ मुलगा नामे राहुल भगवानराव दहिफळे हे देखील कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराचे असेही कथन की, उपरोक्त नमूद परिच्छेद क्र.२ व ३ मधील नमूद वारसांशिवाय मयत लक्ष्मण माधव केंद्रे व गवळणबाई लक्ष्मणराव केंद्रे यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

४. अर्जदाराचे विशिष्ट कथन असे की, उपरोक्त मयताच्या मृत्यु पश्चात विविध शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी अर्जदारास मयत लक्ष्मण माधव केंद्रे व गवळणबाई लक्ष्मणराव केंद्रे यांच्या वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरिता अर्जदार हे संबंधित कार्यालयामध्ये गेले असता त्यांना सक्षम न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र आणण्याचे सूचित करण्यात आले. सबब, प्रस्तुत अर्ज.

५. अर्जदाराने अर्जातील कथनांच्या सत्यतेसाठी स्वतःचे साक्षीपुराव्याचे शपथपत्र नि.क्र.११ वर दाखल करून अर्जातील मजकुराचा पूनःउल्लेख केला आहे. तसेच उपरोक्त मागणी केल्याप्रमाणे म्हणजेच मयत लक्ष्मण माधव केंद्रे व गवळणबाई लक्ष्मणराव केंद्रे यांच्या वारसांच्या नावे प्रस्तुत अर्ज मंजूर होण्याबाबत शपथेवर कथन केलेले आहे. अर्जदाराने नि.क्र.१२ सोबत मयत लक्ष्मण माधव केंद्रे व गवळणबाई लक्ष्मणराव केंद्रे यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती व वारसांबाबतचे स्वयंघोषणा पत्र इ. दस्त अभिलेखावर दाखल करून नि.क्र.१३ वरील पूरसीस अन्वये

त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

६. अर्जदाराने अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र दै. 'यशवंत' या दिनांक ०४.११.२०२५ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द केले. मात्र मूदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

७. उपरोक्त कागदपत्रांच्या अनुषंगाने व अर्जदाराच्या साक्षीपुराव्यावरून असे स्पष्ट होते की, लक्ष्मण माधव केंद्रे व गवळणबाई लक्ष्मणराव केंद्रे हे अर्जदाराने अर्जात नमूद केलेल्या तारखेस मयत झालेले आहेत; तसेच त्यांनी मृत्यूपत्र केलेले नाही. असे देखील स्पष्ट होते की, जाहीर प्रगटन दिल्यानंतर मूदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदाराने ते आणि उपरोक्त परिच्छेद क्र.२ व ३ मध्ये नमूद इतर ७ व्यक्ती हे मयत लक्ष्मण माधव केंद्रे व गवळणबाई लक्ष्मणराव केंद्रे यांचे वारसदार असल्याचे शपथेवर कथन केलेले आहे. येथे असे नमूद करणे आवश्यक आहे की, साक्षीदाराने उपरोक्त सर्व बाबी शपथेवर कथन केलेल्या आहेत, त्यामुळे त्यांच्या कथनांवर अविश्वास दाखविण्यासारखी कोणतीही परिस्थिती न्यायालयासमोर नाही. तसेच प्रस्तुत अर्ज हा अर्जदाराने मयत लक्ष्मण माधव केंद्रे व गवळणबाई लक्ष्मणराव केंद्रे यांचे वारसदार असल्याचे केवळ औपचारिकपणे मान्य करण्याकरिता दाखल केल्यामुळे अर्जदाराची गरज लक्षात घेवून त्यांना तसे औपचारिकपणे वारस मान्य करणे गरजेचे आहे. सबब, अर्जदार व परिच्छेद क्र.२ व ३ मध्ये नमूद इतर ७ व्यक्ती हे मयत लक्ष्मण माधव केंद्रे व गवळणबाई लक्ष्मणराव केंद्रे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देणे योग्य व न्यायाचे होईल. अंततः खालील आदेश पारीत करण्यात येत आहे:

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उपरोक्त परिच्छेद क्र.२ व ३ मध्ये नमूद केलेले अर्जदार आणि इतर ७ वारसदार हे मयत लक्ष्मण माधव केंद्रे व गवळणबाई लक्ष्मणराव केंद्रे यांचे कायदेशीर वारस आहेत, असे औपचारिकपणे मान्य करण्यात येते.

३. उपरोक्त परिच्छेद क्र.२ व ३ मध्ये नमूद केलेले अर्जदार आणि इतर ७ वारसदार हे मयत लक्ष्मण माधव केंद्रे व गवळणबाई लक्ष्मणराव केंद्रे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे विहित नमुन्यातील वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) हे अर्जदाराने आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

४. मुंबई नियमन ८, १८२७ चे कलम ७ प्रमाणे तसेच दिवाणी नियमावलीचा परिच्छेद क्र.३१२ प्रमाणे प्रस्तुत प्रमाणपत्रावर तशी टीप नमूद करावी.

Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2026.04.13 12:43:50 +0530

दिनांक : १३.०४.२०२६ (भालचंद्र रा. झेंडे)

ठिकाण : उदगीर. ३ रे सह–दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), उदगीर.